नकारात्मक व्यक्तींमुळे वृद्धत्वाला वेग

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : माणूस किती वेगाने वृद्ध होत जाणार, हे त्याच्या जवळच्या लोकांवर अवलंबून असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. आपल्याजवळ त्रासदायक किंवा सतत तणाव निर्माण करणाऱ्या व्यक्ती असल्यास आपल्या जैविक वृद्धत्वाचा वेग वाढू शकतो, असे एका नव्या अभ्यासातून आढळून आले आहे.

अशा नकारात्मक मानसिकता असलेल्या व्यक्तींमुळे वृद्धत्वाचा वेग सुमारे १.५ टक्क्यांनी वाढतो आणि संबंधित व्यक्तीचे जैविक वय नेहमीपेक्षा नऊ महिन्यांनी अधिक असते. त्यातही ही व्यक्ती कुटुंबातील असल्यास त्याचा परिणाम प्रकर्षाने दिसून येत असल्याचे या अभ्यासात स्पष्ट झाले आहे. 'प्रोसीडिंग्स ऑफ द नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या या शोधनिबंधानुसार, अभ्यासात सहभागी झालेल्या ३० टक्के व्यक्तींच्या आयुष्यात किमान एक तरी अशा प्रकारची त्रासदायक व्यक्ती असल्याचे नोंदवण्यात आले. अमेरिकेतील इंडियाना प्रांतातील २,३४५ नागरिकांच्या नाळेच्या नमुन्यांवर आधारित या अभ्यासात डीएनए मिथाइलेशन या प्रक्रियेचे विश्लेषण करण्यात आले. दीर्घकाळ टिकणारा मानसिक ताण जैविक वृद्धत्वाला गती देऊ शकतो, त्यामुळे निरोगी वृद्धत्वासाठी हानीकारक संबंध कमी करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra
घर घर का साथी
एक परिवार एक बैंक
गोल्ड लोन
@8.35%* शून्य प्रक्रिया शुल्क
मिस्ड कॉल दो 8010 614 614
अर्जासाठी स्कॅन करा

केस, त्वचा व सर्व आरोग्य तक्रारींवर
डॉ. मानसी Tanvi HERBALS क्लिनिक
डॉ. मानसी तन्वी हर्बल क्लिनिक
डॉ पुष्कराज 9833683021
रोज फ्री चेकअप (ठाणे)
स्पिरुलिनी+ कॅप्सूल्स, केशकलरा लेप, कुमकुमादी शतधौत घृत, मंत्रचिकित्सानुभव पुस्तक व तन्वी हर्बल प्रॉडक्ट्स उपलब्ध...

महिला, बालकांची सुरक्षा, आरोग्यास प्राधान्य - दीपाली बारस्कर

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : शहरातील मुली, महिला आणि बालकांची सुरक्षा, सुविधा व सुरक्षेला प्राधान्य देणाऱ्या उपाययोजना राबवण्याचे आश्वासन महापालिकेच्या नवनिर्वाचित महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दीपाली बारस्कर यांनी निवडीनंतर बोलताना दिले.

दीपाली बारस्कर यांची सभापतीपदी व उपसभापतीपदी वर्षा सानप यांची आज, मंगळवारी बिनविरोध निवड झाली. त्यानंतर त्यांनी महिला व बालकल्याण समितीमार्फत शहरात राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शहरात विशेषतः बाजारपेठेत महिलांना स्वच्छतागृहे, हिरकणी कक्ष, महिला व युवतींसाठी स्वसंरक्षण मार्गदर्शन, चारही प्रभाग समित्यांमध्ये बालकांसाठी आरोग्य केंद्र सुरू करण्यास प्राधान्य राहील, असे सांगून सभापती बारस्कर म्हणाल्या, प्रत्येक प्रभाग समितीअंतर्गत मनपाच्या अंगणवाड्या सुरू करून तेथे येत असलेल्या बालकांना पोषक आहार, त्यांना खेळाचे साहित्य, त्यांची आरोग्य तपासणी व उपचार मार्गदर्शन तसेच प्रत्येक प्रभागात महिलांसाठी खुली व्यायामशाळा व जॉगिंग ट्रॅक, निःशुल्क योगा प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करू.

अंदाजपत्रकात महिला व बालकल्याण समितीसाठी राखीव निधी असतो. तो निधी महिला व बालकल्याणाच्या उपक्रमावर खर्च होईल याची दक्षता घेवून, असे सांगून बारस्कर म्हणाल्या, स्वतंत्र निधी असला तरी तो वेळेवर मिळत नाही व त्यातून कामे होत नाही, हे मी या समितीची पूर्वी सदस्य असताना अनुभवले. मात्र, आता निधी उपलब्धता व त्याचा योग्य विनियोग याला प्राधान्य राहील. सध्या शाळेच मुलींसाठी सुरू असलेली कर्करोग प्रतिबंधक लसीकरण मोहीम प्रभावी राबवण्यासाठी मनपाद्वारे जनजागृती केली जाईल, या लसीकरणाबाबतचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न राहतील.

महिलांची शौर्यगाथा सांगणार - सानप

शहरात 'जगराणी' हा विशेष उपक्रम राबवणार असल्याचे उपसभापती वर्षा सानप यांनी सांगितले. या उपक्रमांतर्गत राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी, झाशीची राणी लक्ष्मीबाई व अन्य महान कार्य करणाऱ्या महिलांचे जीवन चरित्र कथाकथन शाळा, महाविद्यालयातून सांगितले जाणार आहे. महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नसल्याचे भारतीय संस्कृती परंपरा व महिलांच्या शौर्यगाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे वर्षा सानप यांनी सांगितले.

महापालिकेच्या स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे व महिला बालकल्याण समिती सभापती दिपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप यांचा निवडीनंतर पिठासन अधिकारी आनंद भंडारी यांनी सत्कार केला. आयुक्त यशवंत डांगे यावेळी उपस्थित होते.

पाणीपट्टी, घरपट्टी, वाहनतळ शुल्क कमी करणार

प्रशासकाच्या निर्णयांचा फेरआढावा - सुभाष लोंढे

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : मालमत्ता करासाठी चुकीचे सर्वेक्षण झाल्याच्या व पाणीपट्टी वाढल्याच्याही तक्रारी आहेत. मात्र, शहराला रोज पाणी मिळत नाही. वाहनतळ शुल्कही वाढले आहे. या वाढीव शुल्कांचा स्थायी समितीच्या सर्व सदस्यांच्या उपस्थितीत फेरआढावा घेऊन ते कमी करण्यास प्राधान्य देवू, असे महापालिकेच्या स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती सुभाष लोंढे यांनी आज, मंगळवारी निवडीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. शहराला रोज पाणी देण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दोन वर्षांच्या प्रशासक राजमध्ये नागरी समस्या वाढल्या. पाण्याचा प्रश्नही प्रलंबित आहे. समितीच्या माध्यमातून प्रलंबित समस्या सोडवण्यासह रोज पाणीपुरवठा करण्यास प्राधान्य देवू, असे स्पष्ट करून सभापती लोंढे म्हणाले, पाणीपट्टी वाढली आहे. घरपट्टीचे चुकीचे सर्व्हेक्षण झाल्याने प्रशासक आढावा घेतला जाईल. ठेकेदार संस्थेला शुल्क वसुलीचे काम कोणत्या दराने दिले गेले, प्रत्यक्षात कोणत्या दराने वसुली होते याचा आढावा घेऊ. समितीमध्ये जुने अनुभवी व नवे सदस्यही असल्याने सर्वांच्या सहमतीने फेरआढावा घेण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यासाठी नवा ठेकेदार नेमला जाईल तसेच रस्त्यावर मोकाट जनावरांचा त्रास कमी होण्याच्यादृष्टीने कोंडवाडा विभागाचे काम गतिमान करण्यास चालना देऊ, असेही त्यांनी सांगितले.

'प्रशासक राज'अंदाजपत्रकातून दिसेलच

दोन वर्षांच्या प्रशासक काळात महापालिका किती तोट्यात व किती फायद्यात आहे, हे आगामी अंदाजपत्रकातून समोर येईलच, अशी टिप्पणी करून सभापती लोंढे म्हणाले, मनपाच्या उत्पन्न वाढीचे प्रयत्न असणार आहेत, पण मनपाची सद्य आर्थिकस्थिती काय आहे, हे अंदाजपत्रकातून स्पष्ट झाल्यावर त्याद्दीष्टाने प्रयत्न केले जातील. प्रशासक काळातील निर्णयांचाही फेरआढावा घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

कोणत्या ठेकेदार कंपनीद्वारे सर्वेक्षण झाले व त्यांनी ते कसे केले, हे स्थायी समितीच्या माध्यमातून समजून घेतले जाईल व वाढ कमी करण्याचा प्रयत्न राहील.

वाहनतळ व त्याची शुल्क आकारणी व ठेकेदार संस्थेमार्फत त्याची होणारी वसुली याचाही काळात कोणत्या ठेकेदार कंपनीद्वारे सर्वेक्षण झाले व त्यांनी ते कसे केले, हे स्थायी समितीच्या माध्यमातून समजून घेतले जाईल व वाढ कमी करण्याचा प्रयत्न राहील.

वाहनतळ व त्याची शुल्क आकारणी व ठेकेदार संस्थेमार्फत त्याची होणारी वसुली याचाही आढावा घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

लिंगदेवमधील 'संगीत आखाडी'तील पात्रांसाठी १६ लाखांवर बोली

गुढीपाडव्याला पौराणिक पात्रांची सोंगे

लोकसत्ता वार्ताहर

अकोले : गुढीपाडव्याच्या दिवशी लिंगदेव येथे साजऱ्या होणाऱ्या पारंपरिक संगीत आखाडीतील विविध पात्रांच्या लिलावात यावर्षी सुमारे १६ लाख रुपयांची बोली लावण्यात आली. इतिहास, संस्कृती आणि अध्यात्माचा वारसा लाभलेल्या अकोले तालुक्याने अनेक प्रथा परंपरा जपल्या आहेत. लिंगदेव येथील 'संगीत आखाडी'ची परंपरा त्यातीलच एक.

लिंगदेव (अकोले) हे मुळा नदीचा तीरावर वसलेले एक गाव. गावात भगवान लिंगेश्वराचे प्राचीन मंदिर असून गुढीपाडव्याचे दिवशी लिंगेश्वराची यात्रा भरते. याच दिवशी रात्री संगीत आखाडी असते. काळ्या ओघात अनेक गावांतील आखाडी उत्सव इतिहास जमा झाले असले तरी लिंगदेव गावाने संगीत आखाडीचे वैभव जपले आहे. परंपरा जपत असताना काळानुरूप काही बदल केल्यामुळे या आखाडीत सांस्कृतिक कार्यक्रमाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे.

या पारंपरिक आखाडीत ग्रामस्थ रामायण, महाभारत, विष्णुपुराण यातील विविध पात्रांची सोंगे घेऊन नृत्य सादर करतात. वेशिष्ट्य म्हणजे आखाडीत जी सोंगे नाचवली जातात त्या सोंगांचे लिलाव होतात. गावचे भूमिपुत्र असणाऱ्या व्यक्तीलाच सोंगाचा मान मिळतो. या वर्षीचा सोंगांचा हा लिलाव मुकताच झाला. नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने परगावी असणारे भूमिपुत्र ऑनलाईन या लिलाव प्रक्रियेत सहभागी झाले होते. लिलावात लावलेल्या बोलीतून देवस्थानला तब्बल १६ लाख ८ हजार १०० रुपये मिळाल्याची माहिती लिंगेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दत्तात्रय फापाळे यांनी दिली.

इंद्रजीत पात्रासाठी सर्वाधिक बोली

या वर्षी सर्वाधिक बोली इंद्रजीत या पात्रासाठी ९२ हजार रुपयांची (अर्णव अमोल फापाळे) लावण्यात आली. त्या खालोखाल सूर्यधाराच्या तसेच हिरण्यकश्यपूच्या सोंगावर प्रत्येकी ८० हजार रुपयांची बोली लावली गेली. संगीत आखाडीतील काही प्रमुख पात्रांचे लिलाव पुढीलप्रमाणे आहेत: सूत्रधार- मुख्याध्यापक एकनाथ फापाळे (८० हजार रु.). हिरण्यकश्यपू- जीवन होलगीर (८० हजार), रावण- बब्सी होलगीर (७६ हजार), भीम-भीमा होलगीर (५४ हजार), यमराज- विष्णु होलगीर (४० हजार), कृष्ण-भीष्म-अर्जुन - बाळासाहेब होलगीर (६० हजार), कर्ण-श्रीकृष्ण-अर्जुन - बाळासाहेब कानवडे (३३ हजार), वेताळ - इंजि. राहुल मनोहर फापाळे (४६ हजार), खंडेराय- अनिल शिंदे (५१ हजार), वाघ्या-मुरुली - भिमाशंकर हाडवळे (५५ हजार), घटोत्कच - धोंडीभाऊ कानवडे (२६ हजार रु.).

औद्योगिक गॅसपुरवठा बंद; २५ टक्के उद्योगांना फटका

२५० कारखान्यांतील उत्पादन थंडावले

विविध प्रक्रियांसाठी गॅसचा वापर

आम्ब्या झोझिन इलेक्ट्रिकल्स्सह या कारखान्यात इलेक्ट्रिकल मोटर व अल्टरनेटरचे उत्पादन केले जाते. उत्पादन प्रक्रियेमध्ये विविध टप्प्यांवर औद्योगिक वापराच्या गॅसचा उपयोग केला जातो. परंतु, हा पुरवठा दोन दिवसांपासून न झाल्याने उत्पादन प्रक्रिया बंद पडली आहे. याचा थेट परिणाम सुमारे ९०० कामगारांवर झाला आहे.

- मिलिंद कुलकर्णी, उद्योजक

मोहनीराज लहाडे, लोकसत्ता

अहिल्यानगर : औद्योगिक वापराच्या गॅसचा पुरवठा बंद पडल्याने अहिल्यानगर शहरालगतच्या नागापूर एमआयडीसीमधील सुमारे २५ टक्के उद्योगांचे उत्पादन ठप्प झाले आहे. याचा थेट परिणाम सुमारे १५०० हजार कामगारांवर झाला आहे. गॅस पुरवठा सुरळीत रहावा, यासाठी उद्योजकांचे शिष्टमंडळ जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार असल्याची माहिती असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (आमी) या उद्योजकांच्या संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी ह्यलोकसत्ताह्णशी बोलताना दिली.

औद्योगिक वापराच्या गॅस पुरवठ्याचा प्रश्न युद्धाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून जाणवू लागला असून, त्यामुळे लघुउद्योजक अडचणीत आल्याचे त्यांनी सांगितले. सुमारे २०० ते २५० लघुउद्योजकांच्या कारखान्यातील उत्पादनावर परिणाम झाल्याचे त्यांनी सांगितले.

अधिक माहिती देताना जयद्रथ खाकाळ म्हणाले, पावडर कोटिंग करणाऱ्या कंपन्या, इलेक्ट्रिक मोटर, अल्टरनेटर याचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यातील उत्पादनातील विविध प्रक्रियांसाठी गॅसचा वापर आवश्यक असतो, त्याशिवाय या प्रक्रिया होत नाहीत. परंतु, आता गॅस पुरवठा ठप्प झाल्याचा उत्पादनावर परिणाम झाला आहे.

अनेक कंपन्यांच्या उत्पादनासाठी विविध प्रक्रियांसाठी औद्योगिक गॅसच्या वापराची आवश्यकता असते. परंतु, हा पुरवठा बंद पडल्याने उत्पादनच बंद झाले आहे.

नागापूर एमआयडीसीमध्ये सुमारे ९ ते १० हजार कामगार काम करतात, त्यापैकी उत्पादन ठप्प झालेल्या कारखान्यातील संख्या दीड हजारावर असावी. उत्पादनासाठी तातडीने औद्योगिक गॅसचा वापर बंद करून अन्य पर्यायी मार्गांचा अवलंब, जसे की डिझेल किंवा विजेवरील इंजिन भट्टी यासारख्या पर्यायी मार्गांचा अवलंब करणे शक्य नाही. कारण गॅस वापरावरील यंत्रणा कारखान्यातून उभारण्यात आलेली असते. पर्यायी यंत्रणा लगेचच उभारणी करणे शक्य नाही. तसे केल्यास उत्पादनाच्या खर्चात वाढ होणार आहे. ते लघुउद्योजकांना परवडणारे नाही.

जिल्हाधिकाऱ्यांना शुक्रवारी भेटणार

औद्योगिक वापराच्या गॅसचा पुरवठा बंद झाल्याने लघुउद्योजकांच्या व कामगारांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी शिष्टमंडळ शुक्रवारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन घेणार आहे. आज जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु वेळ मिळाला नाही.

- जयद्रथ खकाळ, अध्यक्ष, आमी संघटना.

कच्च्या मालाच्या किंमतीत मोठी वाढ

कूड ऑइलच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. प्लास्टिक उत्पादनासाठी कूड ऑइलचा वापर केला जातो. त्यामुळे प्लास्टिकच्या किमतीमध्ये १२० रुपयांवरून १९० रुपये प्रति किलो अशी वाढ झाली आहे. उत्पादन खर्च वाढला आहे. मात्र, 'जॉब वर्क' करणाऱ्या कारखान्यांनी मोठ्या कंपन्यांशी पुरवठ्याचे करार पूर्वीच केले असल्याने त्यांना उत्पादन खर्च वाढला तरी जुन्याच दराने पुरवठा करावा लागणार आहे. याशिवाय विविध प्रकारच्या कच्च्या मालाच्या दरामध्येही मोठी वाढ झाली आहे. त्याचा भूर्दंड लघुउद्योजकांना सहन होणारा नाही. त्यातून उद्योजकांच्या 'कॅश फ्लो'वर परिणाम होणार असल्याकडे लक्ष वेधले जात आहे.

Maharashtra Airport Development Company Ltd.
(CIN U45203MH2002SGC136979)
Corrigendum - MADC RECRUITMENT - 2026
MADC RECRUITMENT NOTICE 2026 PUBLISHED ON MADC OFFICIAL WEBSITE ON 07/03/2026
With reference to the MADC Recruitment Notice 2026 published in the newspaper dated 07/03/2026, it is hereby informed that, the last date for submission of applications is hereby extended to 27/03/2026 and there are few other changes in advertisement.
For the details visit www.madcindia.org. Details will be available on the website from 11/03/2026 from 13.00 hours.
Sd/-
Vice Chairman and Managing Director

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 से आपके लिए "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911
विक्री सूचना
क्षेत्रीय कार्यालय - पहिला मजला, आंबेगॅाव मालपानी टॉवर, शासकीय दुध डेअरी समोर, जालना रोड, छ. संभाजीनगर
स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना किंवा ई-लिलाव सूचना
सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना. याव्दारे सामान्यतः जनतेसाठी आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली तारण मालमत्ता ज्याचा भौतिक / प्रतिकात्मक ताबा सेंट्रल बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. सदर मालमत्तेची विक्री "जसे आहे तसं", "जिथे आहे तिथे" व "वशी आहे" त्या स्थितीत ऑनलाईन वेबपोर्टल https://ebikray.in (PSB Alliance Pvt. Ltd.) आणि https://www.baanknet.com द्वारे दिनांक ३०.०३.२०२६ रोजी, या तत्तावर कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, सेंट्रल बँक ऑफ, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व स्थावर असलेला बोजा यांची माहिती खालीलप्रमाणे विक्रीचा तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया www.centralbankofindia.co.in वेबसाईटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा
स्थावर मालमत्तेचे वर्णन

निव्वळ थकीत क्र.	शाखेचे / कर्जदाराचे / जमीनदाराचे नाव आणि ताबा प्रकार	थकित रक्कम	मालमत्तेचे विवरण	राखीव रक्कम	बयाणा रक्कम ठेव	किमान बोली वाढ ज्याव्दारे बोली लावणी जाणार
१	कर्जदार - मे. मेगोन होलिअरी प्रोप्रा. श्री. इम्मानुईल मानिज मेगोन बसंत अपार्टमेंट, वार्ड नं.०१, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ कर्जदार आणि तारणदार - श्री. इम्मानुईल मानिज मेगोन प्रोप्रा. मे. मेगोन होलिअरी बसंत अपार्टमेंट, वार्ड नं.०१, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ जामीनदार - श्री. मानिज अलि मोहम्मद मेगोन बसंत अपार्टमेंट, वार्ड नं.०१, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ शाखा - श्रीरामपुर संपर्क - ९८२४७१९११११ (सांकेतिक ताबा)	रु. 9,80,731.00 (रुपये नव लाख ऐंशी हजार सातशे एकतीस फक्त) अधिक व्याज , किंमत आणि खर्च	कमर्शियल मालमत्ता मालकी हक्क श्री इम्मानुईल मानिज मेगोन, शॉप नं.५, बिल्डींग बसंत अपार्टमेंट, सर्व्हे नं. ३७ भाग, सिटीएस नं. १८२२ चाप, क्षेत्रफळ एरिया १५.३८ स्क्वे.मी., कमेरी रोड, वार्ड नं.१, श्रीरामपुर, श्रीरामपुर म्युनिसिपल हद्दीत, जि. अहमदनगर **चतुर्सिमा - उत्तर** - सामाईक रस्ता, **दक्षिण** - घाडिया आणि दुकानासाठी असलेली बोकळी जागा, **पूर्व** - सामाईक जिना, **पश्चिम** - श्री. बशा यांचे दुकान	रु. 4,05,000.00/- (रुपये चार लाख पाच हजार फक्त)	रु. 40,500.00	रु. 10,000.00 (रुपये दहा हजार)
२.	कर्जदार: श्रीमती गायत्री प्रकाश खरे प्रकाश मनोहर खरे यांची पत्नी गोकुल नगर, कोपरगाव, ता. अहमदनगर-४२३६०१ सह-कर्जदार : श्री. प्रकाश मनोहर खरे गोकुळ नगर, कोपरगाव, ता. अहमदनगर- ४२३६०१ जामीनदार - श्री. धोंडीराम माधव दळे, मयत माधव तात्याबा दळे यांचा मुलगा, हनुमान मंदिर, दौंड बु., कोपरगाव, जि. अहमदनगर शाखा - कोपरगाव संपर्क - ९८२२७१९१११ (प्रत्यक्ष ताबा)	रु. 20,54576/- (रु. तीस लाख चौपन हजार पाचशे शहात्तर) तसेच पुढील व्याज खर्च आणि खर्च	रहिवाशी मालमत्ता मालकी हक्क सायर्व्हायर्स श्रीमती गायत्री प्रकाश खरे यांची श्री. प्रकाश मनोहर खरे, फ्लॅट नं.१, बांधीव क्षेत्र ७४.३४ स्क्वे.मी. (८०० स्क्वे.फुट) तळ मजला, श्री कॉम्प्लेक्स, फ्लॅट नं.१एल, क्षेत्रफळ २०.७३ स्क्वे.मी., ता. कोपरगाव, जि. अहमदनगर, एकूण क्षेत्र २०७.१९ मधून १०३.५९ स्क्वे.मी., सर्व्हे नं. २०३/८०, गोकुळ नागरी वसिन सहयाद्री बॉलनी, वीरेवाडी, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर - ४२३ ६०१. **चतुर्सिमा - पूर्व** - खाली मिळकत, **पश्चिम** - फ्लॅट नं.२, **दक्षिण** - रस्ता, **उत्तर** - फ्लॅट नं.१ ची	रु. 30,21,000/- (रुपये तीस लाख एकवीस हजार)	रु. 3,02,100/-	रु. 10,000 (रुपये दहा हजार)
३.	कर्जदार - १. श्रीमती रमा राकेश मनवंदा विजयनिधि बिल्डींग, रूम नं.१८, सिरसा मजला, दिल्ली- ११००१ २. श्री. राकेश कुमार मनवंदा डब्ल्यूझेड २५, रामनगर एक्सटेंशन टिळकनगर, न्यू दिल्ली - ४४००१८ ३. श्री. ओ.पी. पृथ्वी आर२-७/२, ऊत्तमसनगर, दिल्ली-५९ शाखा - शिर्डी संपर्क - ९८२४७१९१११ (प्रत्यक्ष ताबा)	रु. 6,52,037/- (रुपये सहा लाख बावन हजार सदतीस फक्त) अधिक व्याज , किंमत आणि खर्च	मालमत्ता स्थिरिचा नं. ५३६८/२०१०, दिनांक २९/१२/२०१० **मालमत्ता रहिवाशी घर मालकी हक्क श्रीमती रमा राकेश मनवंदा आणि राकेश कुमार मनवंदा**, मालमत्ता निमाण केंद्रकडे गाव, गट नं. ७४/३, साई शरनम ईमारत, जी-क्वॉर्क, फ्लॅट नं. २०८, दुसरा मजला, मिमयवा सी-साईड, ता. रहता, जि. अहमदनगर. क्षेत्रफळ ५३५ स्क्वे.फुट **चतुर्सिमा - पूर्व** - नगर मनमाड रस्ता, **दक्षिण** - संस्थान हॉस्टिल सोसायटी, **पश्चिम**- कोरोडोर, **उत्तर** - फ्लॅट नं. जी-२०७	रु. 7,58,000.00/- (रुपये सात लाख अठ्ठावन हजार फक्त)	रु. 75,800.00	रु. 10,000.00 (रुपये दहा हजार)
४.	कर्जदार - श्री. शेखर पांडुरंग आहेर फ्लॅट नं. ३०२, जिजाऊ रॅसिडेन्सी, सर्व्हे नं. ५३, टिपी स्किम नं. ४ पी, चायनल प्लॉट नं. ६० आणि ६१, सव प्लॉट नं. १०, वार्ड नं.७, पुर्नवाद नगर, श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ २. श्रीमती पुजा शेखर आहेर फ्लॅट नं. ३०२, जिजाऊ रॅसिडेन्सी, सर्व्हे नं. ५३, टिपी स्किम नं. ४ पी, चायनल प्लॉट नं. ६० आणि ६१, सव प्लॉट नं. १०, वार्ड नं.७, पुर्नवाद नगर, श्रीरामपुर, जि. अहमदनगर- ४१३ ७०९ शाखा - उक्कलगाव संपर्क - ९८२४७१९१११ (प्रत्यक्ष ताबा)	रु. 26,35,613.00/- (रुपये सव्वीस लाख पस्तीस हजार सहाशे तेरा फक्त) अधिक व्याज , किंमत आणि खर्च	रहिवाशी घर मालकी हक्क श्री. शेखर पांडुरंग आहेर आणि श्रीमती पुजा शेखर आहेर, फ्लॅट नं. ३०२, जिजाऊ रॅसिडेन्सी, बांधीव क्षेत्र ७४.८१ स्क्वे.मी., अमेनिटी एरिया २२.४० स्क्वे.मी., एकुण क्षेत्रफळ ९७.२१ स्क्वे.मी.. सर्व्हे नं. ५३, टीपी स्किम नं. ४पी, चायनल प्लॉट नं. ६० आणि ६१, सव प्लॉट नं. १०, वार्ड नं. ७, पुर्नवाद नगर, श्रीरामपुर, जि. अहमदनगर. **चतुर्सिमा - पूर्व** - अंबायरा कारपार्क तसाई यांची मिळकत, **पश्चिम** - रुंद पुट रोड, **दक्षिण** - फ्लॅट नं. ३०१ आणि जिना **उत्तर** - ३० फुट रस्ता	रु. 28,30,000.00 (रुपये अठ्ठावीस लाख तीस हजार फक्त)	रु. 2,83,000.00	रु. 10,000.00 (रुपये दहा हजार)
५.	कर्जदार - श्री. गोमाजी सुकदेव कुदळे सर्व्हे नंबर १९९/१/४, फ्लॅट नं. ४, माधव नगर, ब्रिजलाल नगर, कोपरगाव, जि. अहमदनगर- ४२३ ६०१ सह-कर्जदार - सौ. कांताबाई गोमाजी कुदळे सर्व्हे नंबर १९९/१/४, फ्लॅट नं. ४, माधव नगर, ब्रिजलाल नगर, कोपरगाव, जि. अहमदनगर - ४२३ ६०१ जामीनदार १. श्री. गणेश एकनाथ कुदळे सहयाद्री कॉलनी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर- ४२३६०१ २. श्री. मनोज काशिनाथ कुदळे सहयाद्री कॉलनी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर- ४२३६०१ शाखा - कोपरगाव संपर्क - ९८२२७१९१११ (सांकेतिक ताबा)	रु. 37,12,443/- (रुपये सदतीस लाख बारा हजार चारशे त्रेचाळीस फक्त) अधिक व्याज , किंमत आणि खर्च	श्री. गोमाजी सुकदेव कुदळे यांच्या मालकीची निवासी मालमत्ता, सर्व्हे क्रमांक १९९/१/४, अतिम भूखंड क्रमांक ४, माधव नगर, ब्रिजलाल नगर अवळ, कोपरगाव, तालुका कोपरगाव आणि जिल्हा अहमदनगर. क्षेत्रफळ - १३५.०० चौ.मी. शहर/नगर आणि नोंदणी जिल्हा अहमदनगर **चतुर्सिमा - पुर्व** - ९ मी. रस्ता **पश्चिम** - अमिनिटी एरीए **उत्तर** - भूखंड क्रमांक ३ **दक्षिण** - भूखंड क्रमांक ५	रु. 66,000.00,00 /- सहासष्ट लाख रुपये)	रु. 6,60,000.00/-	रु. 10,000.00 (रुपये दहा हजार)
६.	कर्जदार: मे. एस जी फुडस् अँण्ड नमकिन प्रोप्रा. श्री. अशोक दगडु भोसले फ्लॅट नं. एफ ७, श्रीरामपुर एमआयडीसी, खंडाळा गाव, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर (एम.एस.) - ४१३७२० २. अशोक दगडु भोसले प्रोप्रा. एस डी फुडस् अँण्ड नमकिन , प्लॉन बोस्को हॉसिंग सोसायटी, सातेवी, ता. अहमदनगर, जि. अहमदनगर पीएमटी लोणी - शाखा संपर्क - ९८२२७१९१११ (प्रत्यक्ष ताबा)	रु. 1,47,57,391.00 (रुपये एक कोटी सत्तेचाळीस लाख सत्तावन हजार तिनशे एक्क्याणव) तसेच पुढील व्याज खर्च आणि खर्च	मालमत्ता मालकी नावे श्री अशोक दगडु भोसले (कर्जदार) प्रोप्रा. एस डी फुडस् अँण्ड नमकिन **मालमत्तेचा पत्ता** - फ्लॉट नं. एफ-७, क्षेत्रफळ एरिया ५१३.३३ स्क्वे.मी. आणि बांधलेले फॅक्टरी शेड, श्रीरामपुर एमआयडीसी, खंडाळा गावाच्या हद्दीत, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर. **चतुर्सिमा - पुर्व** - १५ मी. रुंद एमआयडीसी रस्ता, **पश्चिम** - फ्लॅट नं. एफ-६, **दक्षिण** - २५ मी. रुंद एमआयडीसी रस्ता, **उत्तर** - फ्लॅट नं. एफ-८	रु. 33,20,000.00 (रुपये तेहतीस लाख वीस हजार)	रु. 3,32,000.00	रु. 10,000 (रुपये दहा हजार)

तपासणी दिनांक आणि वेळ - १३.०३.२०२६ शुक्रवार ११.०० ते सु. ४.००
लिलावाची दिनांक आणि वेळ - १०.०३.२०२६ शुक्रवार ११.०० ते सु. ४.००
(मोठी बँक ठेव/शुल्क १० मिनीटांच्या आंटी एक्सटेंशन कलमांसह)
ईएमडी दिनांक - २१.०३.२०२६, वेळ - सकाळी ११.०० ते संध्याकी दारिख आणि वेळ १०.०३.२०२६ सु. ४.००

- बँकेला माहित असलेला मालमत्तेवरील बोझा - माहित नाही - ई-लिलाव विक्रीमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक बोलीदारांनी त्यांची माहिती सेवा प्रदाता https://ebikray.in (PSB Alliance Pvt. Ltd.) कडे आधीच नोंदवावी. आणि यूजर आयडी आणि पासवर्ड मिळेल. इच्छुक बोलीदारांने फक्त पासवर्ड बदलण्याचा यावा. - विक्रीचा तपशिलवार अटी व शर्तीसाठी कृपया https://ebikray.in वेबसाईटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा- https://ebikray.in (PSB Alliance Pvt. Ltd.) आणि & https://www.baanknet.com, अधिक तपशिलांसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद, बी. बालाजी एन. वळले (वरिष्ठ व्यवस्थापक) मो. ९१-९८२२७१९१११ यांच्याशी संपर्क करावा. - सुरक्षा व्याज नियम (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या तरतुदीनुसार अटी आणि शर्ती असतील

सरकेसी कायदा २००१ च्या ८ (६) अंतर्गत वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना
कर्जदार/ जामीनदार/ तारणदार यांना याव्दारे कर्जदारांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी स्थावर सुरक्षिततेच्या विक्रीसाठी सूचित केले जात आहे.
दिनांक - ११.०३.२०२६
स्थळ - औरंगाबाद
अधिकृत अधिकारी
सेंट्रल बँक ऑफ इंडिया